महा.-४४६/२०१०एफ११२६३
स्थापना : २०११
संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043
संत नामदेव महाराज
शेलगाव(जं.)
श्री संत नामदेव महाराज
(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)
ता.- कळंब जि.- धाराशिव
* संस्थेचे मुख्य कार्य *
१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)
कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव
अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे

फ्रेंचाईजी देणे आहे
AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED
Shree Masala
गुंतवणूक २.५ लाख फक्त
आमच्या नामांकीत कंपनीची
संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे
--- आमची वैशिष्ट्ये ---
- ५ दिवसात व्यवसाय सुरू
- कमी भांडवल जास्त नफा
- स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
- कुणीही हा व्यवसाय करु शकते
- सहज, सरळ व सोपा व्यवसाय
- तुम्हाला काहीही बनवायचे नाही
- ग्राहकांची वाढती मागणी
- आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...
संपर्क : ८०८०४९१८६९

• वर्ष ३ रे • अंक २५३ वा • पाने ४ | बुलडाणा, मंगळवार, दि.२३ एप्रिल २०२४ | • RNI NO. : MAHMAR/2022/82056 • किंमत : ३ रुपये



**अक्षराज : आकाश जयस्वाल**
**दि.२२, माहूर (नांदेड) :**
महाराष्ट्रातील साडे तीन शक्तिपीठापैकी एक माहूर गडावरील रेणुका आईच आजच सुंदर छायाचित्र.
**आईचे आजचे दर्शन माहुर गड जय जगदंब**

# महायुती बुलढाण्यासह राज्यात ४५ जागा जिंकणार,
## उद्योगमंत्री उदय सामंत यांचा दावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२२, बुलढाणा :** महायुती महाराष्ट्र राज्यातील ४८ पैकी ४५ जागा जिंकणार असून त्यात बुलढाण्याचाही समावेश असल्याचा दावा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज येथे केला.

मात्र, त्यांनी बुलढाण्यातील अपक्ष उमेदवार रविकांत तुपकरांवर केलेली टीका, त्यावर भाष्य करताना घेतलेला वेळ, माध्यम प्रतिनिधींनाही चक्रावून टाकणारा ठरला. बुलढाण्यात प्रचाराचा आढावा घेण्यासाठी आलेले सामंत यांनी स्थानिक पत्रकार भवनात माध्यमाशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी केंद्रात 'चारशे पार' तर राज्यात '४५ पार' असे भाकित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दहा वर्षांत केलेली दमदार कामगिरी,



देशाचा चौफेर विकास, जगात देशाची उंचावलेली मान, राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात झालेला विकास यामुळे महायुतीला हे घवघवीत यश मिळणार आहे.

बुलढाणा मतदारसंघातही प्रतापराव जाधव बहुमताने निवडून येतील, असा दावाही त्यांनी बोलून दाखविला. यानंतर सामंत अनपेक्षितरित्या अपक्ष उमेदवार तुपकर यांच्यावर घसरले. ते म्हणाले की, शेतकऱ्यांसंदभात आंदोलन करायची आणी न्याय मिळाला की तो माझ्यामुळेच मिळाला असे भासवायचे, असा प्रकार बुलढाणा मतदारसंघात सर्रास सुरू आहे. बियाणे कंपन्यांकडून कोट्यवधी रुपये उकळण्याचे धंदे सुरू असल्याचे ते म्हणाले. दादागिरीने पैसे उकळायचे काम सुरू असल्याचा आरोप त्यांनी तुपकर यांचा नामोल्लेख न करता केला. प्रतापराव जाधव यांच्या विरोधात निवडणुकीत असा शेतकरी नेता उभा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावर नावाची माध्यमांनी विचारणा केली असता त्यांनी तुपकरांचा उल्लेख केला. बुलढाणा मतदारसंघात जाधवांची लढत आघाडी की तुपकर यापैकी कुणासोबत आहे? असे विचारले असता, त्यांनी जाधव यांचा विजय निश्चित असल्याचे सांगितले. दुसऱ्या क्रमाकासाठी अपक्ष रविकांत तुपकर आणि आघाडीचे नरेंद्र तुपकर यांच्यात लढत असल्याचे ते म्हणाले.

# उष्णतेचा रोज नवा विक्रम ! पावसाचा इशारा...

**अक्षराज : प्रदीप चव्हाण**
**दि.२२, धुळे :** राज्यातील सध्याच्या उष्णतेमुळे रोज नवनवे विक्रम होत आहेत. हवामान खात्याच्या माहितीनुसार, राज्यातील वाढती उष्णता काही करून कमी होणार नाही, उलट दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. दिवसा आणि दुपारचा सूर्य २४ तास तापमानवाढीचा परिणाम दाखवेल आणि आता रात्रीचे तापमानही राज्याच्या बहुतांश भागात अपेक्षेपेक्षा जास्त असेल. थोडक्यात, राज्यातील उष्णतेची लाट आता अधिक सक्रिय आणि तीव्र होणार आहे.

एकीकडे सूर्याचा प्रकोप सुरूच आहे, तर दुसरीकडे राज्यात वादळी पावसाची शक्यता आहे. राज्यातील जेऊर शहरात देशातील सर्वाधिक




४२.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात उन्हाचा तडाखा येत्या काही दिवसांत वाढताना दिसणार आहे. उन्हात अवेळी उन्हामुळे उन्हाचा तडाखा अधिकच जाणवणार आहे. राज्यातील धाराशिव, नांदेड, लातूरमध्ये पिवळ्या उष्णतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे विदर्भातील बहुतांश भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

गरज नसल्यास घराबाहेर पडू नये, असे आवाहन यंत्रणेकडून करण्यात येत असून नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या जळगावात ४ अंश सेल्सिअस, सांगलीत ३९.५ अंश सेल्सिअस, संभाजीनगरमध्ये ४०.४, बारामतीत ३७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे

विदर्भ आणि मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह अधूनमधून पाऊस पडू शकतो, असा इशाराही हवामान खात्याने दिल्याने शेतकऱ्यांची चिंता आता वाढली आहे. सध्या पूर्व आणि मध्य विदर्भाच्या दिशेने कमी दाबाचे वारे वाहत आहेत, त्यामुळे तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तर, नाशिक आणि जळगावमध्येही अवकाळी हवामान दिसून येत आहे. कोकणासह उत्तर महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहील, असा इशारा हवामान खात्याने दिला असून, तेथे ताशी १७ते १८किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

कमी आर्द्रतेमुळे सातारा आणि कोल्हापुरात जास्त उष्मा असेल. राज्यातील कोकण विभागातील कमाल तापमान ३७ अंश असेल तर रत्नागिरी आणि ठाण्यात हा आकडा ४२ अंशांपर्यंत पोहोचू शकतो. अशा स्थितीत समुद्रावरून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे मुंबईतील नागरिकांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

# थोडक्यात

## नांदगाव -छत्रपती संभाजीनगर रोडवर अपघात



**अक्षराज : निवृत्ती शिंदे**
**दि.२२, नांदगाव (नाशिक) :** तालुक्यातील ढेकू तांडा येथील रहिवासी गोरख सक्रु राठोड वय ३६ वर्ष धंदा ऊसतोड मजूर यांचे नांदगाव – छत्रपती संभाजी नगर रस्त्यावर चाळीसगाव फाट्या जवळ असलेल्या विट भट्टी पासून हाकेच्या अंतरावर जळगाव बु।। शिवारात शनिवार दि २० रोजी दुपारी २.१५ वाजेच्या दरम्यान छत्रपती संभाजी नगर हून नांदगाव येथे येणार्या परिवहन महामंडळाची बस क्रमांक एम. एच. १४ – बि. टी. १३०३ आणि वरील मयत व्यक्तीची एच एफ डिलक्स मोटारसायकल क्रमांक एम. एच. ४१- बि.जे. ४४१३ यांची समोरासमोर धडक झाल्याने गोरख राठोड यांच्या डोक्याला आणि हाता पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचे निधन झाले आहे. सविस्तर वृत्त असे की, गोरख सक्रु राठोड ऊसतोड कामगार कोळपेवाडी सहकारी साखर कारखान्याला ऊस तोडीत होते. कारखान्याचा पट्टा पडल्याने गावी आपल्या मोटारसायकल वर परतत असतांना शनिवारी अपघात झाला.

अपघात इतका गंभीर होता की, डोक्याला मार लागल्याने व त्यांचे उजवा हात आणि पाय धडा वेगळे झाल्याने रक्त स्राव झाल्याने घटनास्थळी निधन झाले. परिवहन महामंडळाच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार मोटारसायकलचे सुमारे ४० हजार आणि परिवहन महामंडळाच्या बसचे २५ हजार रुपयाचे नुकसान झाले आहे. मयत गोरख राठोड यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, दोन मुले असा परिवार असून गोरख यांच्यावर नांदगाव येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून रात्री ९.३० वाजेच्या दरम्यान शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

वरील घटनेची नांदगाव पोलिस ठाण्यात मयत व्यक्तीचा भाऊ साईनाथ राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आलेला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक प्रितम चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज वाघमारे हे करत आहेत.

## पुण्यात अग्नितांडव ; 3 मजली इमारतीला भीषण आग

**अक्षराज : योगेश जाधव**
**दि.२२, पुणे :** पुण्यातील रविवार पेठेतील अतिशय गजबजलेला आणि व्यापारी केंद्र असलेल्या भोरी आळीतील काही दुकांनाना आज पहाटेच्या सुमारास भीषण आग लागली. या घटनेत मोठ्या प्रमाणात दुकानातील साहित्य भस्मसात झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे सहा बंब घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले आहे. ही आग नेमकी कशी लागली याची माहिती मिळू शकली नाही.

रविवार पेठेतील भोरी आळीतील रामसुख चेंबर्स आणि काही दुकानांना आज पहाटे ५वाजून १० मिनिटांनी आग लागल्याची माहिती अग्निशामक दलाला मिळाली. अग्निशमन दलाकडून मुख्यालय, नायडू, कसबा, गंगाधाम येथून एकुण ४ फायरगाड्या व २ वॉटर टँकर घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. घटनास्थळी पोहोचताच जवानांनी एका इमारतीत तळमजल्यावर असलेल्या काही दुकानामध्ये आग लागल्याचे दिसले. अग्निशामक दलाने प्रथम इमारतीत आणि दुकानामध्ये प्रवेश करत आत कुणी अडकले आहे का याची खातरी करुन चारही बाजूने आगीवर पाण्याचा मारा सुरू केला. यामध्ये कोणीही दगावल्याचे किंवा जखमी झाल्याचे वृत्त नाही.

# कल्याण डोंबिवलीत गर्मीने नागरिक हैराण, थंड पेयांच्या मागणीत वाढ

**अक्षराज : भानुदास गायकवाड**
**दि.२३, डोंबिवली :** उष्णतेच्या लाटेने आता बहुतांश जिल्हे अक्षरशः होरपळून निघाले आहेत. यात ठाणे जिल्ह्याचाही समावेश आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली मधे वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले आहेत.

शरीराला थंडावा मिळावा यासाठी नागरिक थंडगार पेयांचा आस्वाद घेताना दिसत आहेत. वाढत्या उन्हामुळे थंडगार पेयांच्या मागणीत मात्र वाढ झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. ठाणे जिल्ह्यातील काही भागात उच्चांकी ३८ अंश तापमानाची नोंद झाली असून, ढगाळ वातावरणामुळे उकाड्यात प्रचंड वाढ झाली आहे. प्रादेशिक हवामान केंद्राकडून काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून तापमान सातत्याने वाढत होते; परंतु सायंकाळपासून दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ-दहापर्यंत वातावरण थंड राहत होते. गेल्या चार-पाच दिवसांपासून वातावरणात मोठे बदल



होण्यास सुरुवात झाली. गेल्या काही दिवसांपासून तापमान वाढीला सुरुवात झाल्याचे चित्र आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरीसह सिंधुदुर्ग जिल्ह्यात उष्ण लहरी सक्रिय झाल्या आहेत.

किनारी भागात उष्णप्रवाह वाहू लागले आहेत. त्यामुळे या भागात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. वाढलेल्या तापमानाचा मोठा परिणाम नागरिकांच्या आरोग्यासह फळबागांवर होणार आहे. वाढत्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच पाणीटंचाईची झळ जाणवत असल्याने नागरिक त्रस्त आहेत. दरम्यान, प्रशासनाकडून देखील नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

# अहमदनगरमधील १० हजार विद्यार्थ्यांच्या नशिबी पुन्हा पायपीट !

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२२, अहमदनगर :** राज्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधा व गुणवत्तेच्या नावाखाली २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून समुह शाळा उभारण्याच्या दृष्टीने शासनाच्या हालचाली सुरू आहेत. मात्र या धोरणामुळे नगर जिल्ह्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील एकूण ७४७ शाळांना टाळे लागणार असून, तेथील १३१८ शिक्षक अतिरिक्त ठरतील. तर १० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक मुले - मुली शाळा दूर असल्याने शिक्षणापासून वंचित राहतात.

याचा अभ्यास करूनच वाड्या - वस्त्यांवरही शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. घराजवळ शाळा असल्याने अनेक मुले- मुली शिक्षणाच्या प्रवाहात येऊ शकली. आजमितीला या शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. पानशेत आणि तोरणमाळच्या धर्तीवर राज्यासह नगरमध्येही २० पेक्षा कमी पटसंख्येच्या ७४७ शाळांचे एकत्रीकरण करण्याचा शासनाचा विचार आहे. त्यासाठी १५ ऑक्टोबर पर्यंत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना राज्याच्या शिक्षण आयुक्तांनी शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना दिल्या आहेत.

**मुलींच्या शिक्षणाला लागणार ब्रेक**

नगर जिल्ह्यात ७४७ शाळांची पटसंख्या ही २० पेक्षा कमी आहे. या ठिकाणी १३८८ शिक्षक १० हजार ६६८ विद्यार्थ्यांना ज्ञानदान करत आहेत. मात्र, उद्या या शाळा बंद झाल्या, तर संबंधित शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. शिवाय एकत्रीकरणात, दूरवरील शाळेत जावे लागले, तर या मुलांच्या शिक्षणाचे काय, मुलींना पालक शाळेत पाठवतील का, असे अनेक प्रश्नही उपस्थित होऊ लागले आहेत.




## जागतिक पुस्तक दिन

आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गार्सीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही चला तर मग वाचन संस्कृती विषयी चर्चा करू आणि पुस्तक दिन साजरा करू. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.

# रामभक्तीचा सर्वोत्तम नमुना !

हनुमान ऊर्फ मारुती ही रामायणातील एक लोकप्रिय व्यक्तिरेखा असून ते श्री रामांचे महान भक्त, दास, दूत मानले जातात. त्यांचा जन्म अंजनी या वानरीच्या पोटी अंजनेरी येथे झाला होता. हे गाव व या नावाचा डोंगरी किल्ला महाराष्ट्रातल्या नाशिक जिल्ह्यात आहे. मारुतीचे वडील केसरी. वीर मारुती हे अतिशय ताकदवान-महाबली होते. त्यांना अनेक शक्ती सिद्धी प्राप्त होत्या. लहानपणी त्यांना भूक लागली असल्याने ते सूर्याला फळ समजून त्याला पकडण्याच्या इच्छेने सूर्याकडे धाव घेऊ लागले.

परंतु सूर्याला पकडताच त्यांचे हात सूर्याच्या आगीने चळाचळा कापू लागले त्यामुळे ते सूर्यापासून थोडे लांब झाले परंतु त्यांना तो खेळच वाटू लागला ते सारखा सूर्याला पकडायचे व सोडून द्यायचे त्यामुळे सूर्यही त्यांना घाबरु लागला असे करत करत त्यांनी सूर्याला गिळले. ते बघून इंद्रासहित सर्व देवांना काळजी वाटू लागली. सूर्याला व पृथ्वीला वाचविण्यासाठी इंद्राने आपले वज्र हे हनुमानांच्या दिशेने फेकले. त्या प्रहाराने हनुमानजींचे तोंड वाकडे झाले व ते बेशुद्ध पडले. नंतर देवांनी त्यांना भीतीपायी 'तुला आपल्या सर्व शक्तींचा विसर पडेल' असा शाप दिला.



पुढे श्रीराम वनवासात असताना त्यांची व हनुमानाची भेट झाली. रावणाने सीतेचे अपहरण केले तेव्हा हनुमानाने उड्डाण करून लंका गाठली आणि श्रीरामांचा निरोप माता सीतेला पोचवला. याच वेळ जम्बुवन्ताने आठवण करून दिल्याने त्यांना त्यांच्या महापराक्रमी शक्तीची जाणीव झाली. ते वर्ष इ.स.पू. ५०६७ होते असे दिल्लीच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायंटिफिक रिसर्च येथील संशोधकांचे म्हणणे आहे.

लंकाधिपती-रावणाच्या सैनिकांनी मारुतीला पकडून रावणासमोर उभे केले व त्याच्या शेपटीला कापड्याच्या चिंध्या बांधून त्यांना आग लावली. तेव्हा त्याने घरांघरांवर उड्या मारत आपल्या जळत्या शेपटीने पूर्ण लंकेला आग लावून लंका सोडली.

परत जाऊन त्याने सीतेचे वर्तमान रामास कळवले. रामाने आपली वानरसेना लंकेला नेली आणि रावणाशी युद्ध केले. या युद्धात हनुमानाने रामाला मोठी मदत केली. जेव्हा लक्ष्मण बाण लागून बेशुद्ध पडला होता, तेव्हा त्याच्या उपचारांसाठी हनुमानाने उत्तराखंडातील द्रोणागिरी पर्वताकडे झेप घतली. पर्वतावर त्याला हवी ती वनस्पती ओळखू न आल्याने त्याने सर्व द्रोणागिरी पर्वत उचलून आणला. त्या पर्वतावर आढळणाऱ्या संजीवनी नावाच्या वनौषधीने लक्ष्मण परत शुद्धीवर आला व त्याचे प्राण वाचले.

हनुमान हा सप्त चिरंजीवांपैकी एक चिरंजीव आहे, म्हणजे तो अजूनही जिवंत आहे, अशी मान्यता आहे. जगात ज्या ज्या ठिकाणी, जेव्हा जेव्हा रामाचे नाव घेतले जाते, तेथे मारुती हजर असतो, असे म्हणतात. या माहितीच्या आधाराने कवी तुलसीदासाने मारुतीला शोधून काढले.

मारुतीचा उल्लेख महाभारतातदेखील येतो. तो महाभारताच्या युद्धात अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर विराजमान होता. हनुमान जन्मभूमी ही अंजनेरी पर्वतावर त्र्यंबकेश्वर नाशिक हीच आहे. भगवान हनुमानाची आई अंजनी यांच्या नावावरून हे नाव पडले आहे. हनुमान जन्म स्थानाबाबत भौगोलिक पुरावे अंजनेरी पर्वतावर आजही उपलब्ध आहेत. त्र्यंबकेश्वर महात्म्य, नवनाथ भक्तिसार, गौतमी महात्म्य या पवित्र हिंदू धर्मग्रंथांमध्ये हनुमान जन्मस्थान हे अंजनेरी पर्वतच असल्याचे सिद्ध झालेले आहे. प्रसिद्ध मराठी संत-कवी एकनाथ यांच्या भावार्थ रामायणात असे म्हटले आहे. !! बजरंगबली की जय !!

**॥ हनुमान जयंतीच्या सर्व बजरंगबली भक्तांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा ॥**

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३**

# 'रामसे बडा रामका नाम' ही म्हण सार्थ ठरवणारा भक्तशिरोमणी हनुमान !

'एकदा हनुमानाची निस्सीम भक्ती पाहून प्रभु श्रीरामाने हनुमानाला वर मागण्यास सांगितले. 'जो कुणी प्रभु श्रीरामाचे स्मरण करत असेल, त्याचे संरक्षण हनुमंत करील आणि कुणीही त्या व्यक्तीचे अहित करू शकणार नाही', असा वर हनुमानाने मागितला. प्रभु श्रीरामाने 'तथाऽस्तु' म्हटले. त्रेतायुगात प्रभु श्रीराम अयोध्येचे राज्य करत असतांना काशीनरेश सौभद्रच्या मनात रामभेटीची मनीषा जागृत झाली. त्याच वेळी महर्षि विश्वामित्र यांच्याही मनात प्रभु श्रीरामाला भेटण्याची इच्छा निर्माण झाली. दोघेही अयोध्येच्या दिशेने निघाले. वाटेत एका शिव मंदिरात दोघांची भेट झाली. विश्वामित्रांचे शिष्य शिवाच्या मंदिरात विश्वामित्रांचा जयजयकार करत होते. 'शिवाच्या मंदिरात केवळ शिवाचाच जयघोष झाला पाहिजे, अन्य कुणाचाही जयजयकार केला, तर शिवाचा अपमान होतो', असे सौभद्र राजाला वाटले आणि त्याने विश्वामित्रांच्या जयजयकाराला विरोध केला. त्यामुळे महर्षि विश्वामित्र त्याच्यावर कोपले आणि त्यांच्यात वाद झाला. दोघेही जेव्हा अयोध्येत पोचले, तेव्हा त्यांना एकाच वेळी प्रभु श्रीरामाचे दर्शन झाले. महर्षि विश्वामित्रांनी प्रभु श्रीरामाला काशीनरेशाला कठोर शिक्षा करण्याची आज्ञा केली. प्रभु श्रीरामाने दुसर्या दिवशी न्यायसभेत वरील प्रसंगाचा न्यायनिवाडा करणार असल्याचे घोषित केले. 'प्रभु श्रीराम महर्षि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून आपल्याला कठोर दंडित करतील', या विचाराने सौभद्र भयग्रस्त झाला. इतक्यात तेथे नारदमुनी प्रगट झाले आणि त्यांनी सौभद्राला हनुमंताची माता अंजनीदेवीला शरण जाण्यास सांगितले. नारदमुनींच्या सांगण्यावरून सौभद्र सुमेरूला गेला आणि त्याने अंजनीमातेचे चरण धरले. अंजनीमातेने त्याची स्थिती जाणून घेतल्यावर त्याचे रक्षण करण्याचे अभय वचन दिले. तिने हनुमंताला काशीनरेशाचे रक्षण करण्याचे दायित्व सोपवले. हनुमानाने ते स्वीकारले आणि तो दुसर्या दिवशी सौभद्राला सोबत घेऊन पवन वेगाने अयोध्येला येऊन पोचला. त्याने सौभद्रराजाला निर्भय होऊन शरयू नदीच्या किनारी अखंड रामनामाचे स्मरण करत रहाण्यास सांगितले. सौभद्रराजाने अचानक पलायन केल्याची वार्ता दुसर्या दिवशी महर्षि विश्वामित्रांना समजल्यावर ते अधिकच कोपित झाले. त्यांनी श्रीरामाला सौभद्राचा वध करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे प्रभु श्रीरामाने सूर्यास्त होण्यापूर्वी सौभद्राचा वध करण्याचा पण केला. प्रभु श्रीरामाचे सैनिक सौभद्राला सर्वत्र शोधत होते. त्यांनी तो शरयू नदीच्या किनारी हनुमंतासह रामनामात मग्न असल्याची सूचना महर्षि विश्वामित्र आणि श्रीराम यांना दिली. महर्षि विश्वामित्रांसह प्रभु श्रीराम धनुष्य बाण घेऊन शरयू किनारी आले. त्याने पाहिले की, हनुमान पुढे बसलेला आहे आणि त्याच्या मागे सौभद्र राजा बसलेला आहे. दोघेही रामनामाचा अखंड जप करत आहेत. प्रभु श्रीरामाने हनुमानाला बाजूला होण्यास सांगितले, तेव्हा हनुमानाने श्रीरामाला त्यांनी पूर्वी दिलेल्या वचनाची आठवण करून दिली. महर्षि विश्वामित्रांनी सौभद्रावर बाण चालवण्याचा आग्रह केला. प्रभु श्रीरामाला कळेना, 'हनुमानाला दिलेले वरदान खरे करावे कि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून केलेला पण पूर्ण करावा ?' अखेर गुरुस्थानी असणार्या महर्षि विश्वामित्रांच्या आज्ञेवरून प्रभु श्रीरामाने सौभद्रावर बाण सोडला. हनुमानाच्या कृपेमुळे सौभद्राभोवती रामनामाचे संरक्षण निर्माण झाले होते. त्यामुळे प्रभु श्रीरामाचा बाण सौभद्राला लागला नाही. प्रभु श्रीरामाने अनेक बाण सोडले; परंतु एकही बाण सौभद्राला लागला नाही. 'रामबाण विफल होत आहेत', हा चमत्कार पाहून महर्षि विश्वामित्र थक्क झाले. त्यांनी अंतर्मुख होऊन विचार केला आणि त्यांच्या लक्षात आले की, भगवंताला स्वत:च्या वचनापेक्षा भक्ताला दिलेले वरदान पूर्ण होणे अधिक महत्त्वाचे वाटते. त्यामुळे त्यांनी श्रीरामाला पण मागे घेण्यास सांगितले. हनुमानाने काशीनरेश सौभद्राला महर्षि विश्वामित्रांचे चरण धरून क्षमा मागण्यास सांगितले. त्याप्रमाणे सौभद्रने महर्षि विश्वामित्रांची क्षमा मागितली आणि महर्षि विश्वामित्रांनी त्याला क्षमा केले.

अशा प्रकारे हनुमानाने प्रभु श्रीरामाला धर्मसंकटातून सोडवले आणि सौभद्र राजाचे रक्षणही केले. वरदान आणि पण यांच्या युद्धात वरदानाचा विजय झाला. जर एखादा रामनामाचा जप करत असेल आणि साक्षात् प्रभु श्रीरामाने त्यावर बाण चालवला, तरी त्याचे काहीही अहित होत नाही, हे या प्रसंगातून दिसून येते. भक्तशिरोमणी हनुमानाने 'रामसे बडा रामका नाम' ही म्हण सार्थ ठरवली.'

(साभार : सनातन डॉट ऑर्ग)
**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## (हनुमंत)

मारूती गेला लंकेला
केली चाणाक्ष पाहणी
लाजवेलं रे धुरंधराला
अशीआगळी कहाणी

सेतू नाही सागरावरी
ते खोल किती पाणी
लंका कशी कुठे असे
खडा न् खडा जाचणी

भेटे सिता माऊलीला
वनवासी करारी राणी
लढा राक्षसी वृत्तीशी
मदतीला नाही कुणी

मारुती राया गुप्तहेर
करी अवघी टेहाळणी
दूत असूनही जाहली
भर सभेत हेटाळणी

रावणी अपराध काय
सांगे सारी खतावणी
शांतीचा अंतिमप्रयत्न
शून्य झाली बतावणी

जळे लंका वाजे डंका
बदलून टाके कहाणी
जळाली वृत्ती रावणी
जिंकला राम सद्गुणी

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# वाचकांचं पत्र !

## रस्त्यावरील होर्डिंग्सचे स्ट्रक्चरल ऑडिट होते का हे तपासावे

पुण्यात १७ एप्रिलला वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस कोसळल्याने उबाळेनगर बसथांब्याजवळील एक होर्डिंग रस्त्यावर कोसळले. यामध्ये जीवित हानी झाली नसली तरी चार ते पाच चारचाकी वाहनांचे नुकसान झाले आहे. रस्त्यावरच होर्डिंग कोसळल्याने यावेळी प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. ४ ते ५ किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. याच दरम्यान परिसरातील विद्युत प्रवाह खंडित झाल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले होते. अर्थात होर्डिंग कोसळल्याची पुण्यातील ही काही पहिली घटना नव्हती. गेल्यावर्षी पिंपरी चिंचवड शहरातील रावेत किवळे परिसरात लोखंडी होर्डिंग कोसळून पाच नागरींकांचा बळी गेला होता. त्यानंतर पुणे महानगरपालिकेने अनधिकृत होर्डिंगच्या विरोधात जोरदार कारवाई केली होती. ज्यामध्ये १२०० हुन अधिक अनधिकृत होर्डिंग्स जमीनदोस्त केल्या होत्या. आता पुन्हा एकदा होर्डिंगमुळे अपघात झाल्याने होर्डिंग्सचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आजमितीला मुंबई, ठाणे, पुणे, पनवेलसारख्या राज्यातील प्रमुख शहरांमध्ये रस्त्यालगत मोठमोठ्या होर्डिंग्स पाहायला मिळतात.

प्रमुख रस्त्यांवर उभारलेल्या बहुतांश होर्डिंग्स या लोखंडी सांगाडा तयार करून उभ्या केलेल्या असतात. अशा होर्डिंग्स कोसळल्यावर नुकसानही मोठ्या प्रमाणात होते. उन्हाळा आणि पावसाळा या दरम्यान अधूनमधून सोसाट्याचा वारा सुटतो अशा वेळी या होर्डिंग्स पडण्याच्या घडतात. रस्त्यालगत उभारल्या जाणाऱ्या या लोखंडी होर्डिंग्सचे वेळच्या वेळी स्ट्रक्चरल ऑडिट होणे महत्वाचे आहे. शहरांतील या होर्डिंग्सचे स्टक्चरल ऑडिट वेळच्या वेळी होते का ? याकडे पालिका प्रशासन लक्ष देते का हे पाहणेही महत्वाचे आहे. पुण्यात घडलेल्या दुर्घटनेमध्ये कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी सध्याच्या बदलत्या वातावरणामुळे अवकाळी पाऊस, वादळी वारा यासारख्या स्थिती कुठे आणि केव्हा निर्माण होतील याची काहीच शक्यता वर्तवता येत नाही. त्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून शहरांतील महापालिकेसह संबंधित विभागाने रस्त्यालगतचे होर्डिंग्स, मोबाईल टॉवर यांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले गेले आहे का याची या दिवसांत युद्ध पातळीवर पडताळणी करावी.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## हनुमंता..

बोला मुखी हनुमंता
पळोदूर जावो व्यथा
भरवसा तया वरती
कष्टावे का उगी वृथा

रामलखन सीतामाता
पायी दास हनुमंता
विहंगम हा सोहळा
तुष्टलो ते रूप पाहता

कानी नीत रामकथा
रामदूता राहो चित्ता
तना मनावर माझ्या
सद्गुणांची हो सत्ता

दान योग घडो हाता
बनव मज सार्थ दाता
दुर्विचारा युध्द करता
संतापुढे झुको माथा

चिरंजीव लावी जीव
तोचि कर्ता करविता
पाठीशी सदैव जाग्रत
दु:ख वेदना हरविता

चिरंजीवी हे भगवंता
उध्दारा जन्म आता
मागे उरावी सद् गाथा
जगातून जाता जाता

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# कै.लक्ष्मणराव भरगुडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य व्याख्यानमालेचे आयोजन

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२२, खंडाळा (सातारा) :** पळशी ता.खंडाळा येथील श्री.सिद्धेश्वराच्या पुण्यभूमी पळशी गावचे थोर सुपुत्र, खंडाळा तालुक्याचे भाग्यविधाते व माजी सभापती कै.लक्ष्मणराव भरगुडे पाटील (भाऊ )यांच्या ४२ व्या पुण्यतिथी निमित्त सोमवार दि.२२ ते बुधवार दि.२४.अखेर दररोज सायंकाळी सहा वाजता भव्य व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सातारा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितीन भरगुडे पाटील यांनी दिली.

पळशी ता.खंडाळा येथील श्री.सिद्धेश्वराच्या पुण्यभूमी पळशी गावचे सुपुत्र व खंडाळा तालुक्याचे भाग्यविधाते व माजी सभापती कै.लक्ष्मणराव भरगुडे पाटील (भाऊ ) यांच्या ४२.व्या पुण्यतिथी निमित्त सोमवार दि.२२ रोजी कविवर्य अनंत राऊत यांचे काव्यमय समाज प्रबोधन, मंगळवार दि.२३ रोजी सुप्रसिद्ध व्याख्याते व प्रबोधनकार युवराज पाटील यांचे चला कुटुंब जपूया. बुधवार दि.२४ रोजी चांडाळ चौकडीच्या करामती फेम बाळासाहेब उर्फ भरत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रसिद्ध व्याख्याते अविनाश भारती यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

यावेळी कै.लक्ष्मणराव भरगुडे पाटील (भाऊ) यांच्या नावे दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार शिरवळ येथील ह.भ.प.चैत्राम कोंडीबा लाखे यांना प्रधान करण्यात येणार आहे.

याच वेळी सकाळी ११ ते दुपारी तीन या वेळेस रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. तरी तालुक्यातील समस्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा. असे आवाहन सातारा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितीन भरगुडे पाटील यांनी केले आहे.

# वाळकी बाजार येथील माता इसाई देवीच्या यात्रेला प्रारंभ

**अक्षराज : बालाजी गायकवाड**

**दि.२२, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील वाळकी बाजार येथील जाग्रत देवस्थान आसलेले माता इसाई देवीच्या दहा दिवसाच्या यात्रेला आज दि.२२ एप्रिल पासुन नुकतेच प्रांरभ झाला आसुन माता इसाई देवीच्या दर्शनासाठी या ठिकाणी महाराष्ट्रा व आध्राप्रदेश राज्य भरातुन भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शन घेण्यासाठी येत असल्याची माहीती पुजारी परसराम टोपाजी गायकवाड यांनी दिली आहे.



हदगाव हिमायतनगर रोडवर आसलेल्या वाळकी बाजार या गावात दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी माता इसाई देवीच्या यात्रेच्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताहा उत्साहाला आज पासुन सुरवात झाली आहे.आज दि.२३/०४/२००२४ रोजी हनुमान जयंतीच्या चैत्र पौर्णिमा या दिवशी रात्री १२ वा. सुमारास देविचा जय घोष करित छबिना निघतो या छबिनात भाविक भक्ताची मोठ्या प्रमाणात गर्दि असते.विशेषता इसाई देवी माता ही चुलीमध्ये मुर्ती असुन हे निद्र आवस्थम ध्ये आहे.व या मंदीराची निर्मिती निच्छित काही सांगता येत नसुन देवीचे मंदीर हे चिरेबंदी व हेमाडपंती आसुन या ठिकाणी देवीच्या मुख्य प्रवेशव्दारा समोर एक छोट दिपमाळ व दोन भवे आशा चिरबंदी दिपम ाळ आहेत. त्या ठिकाणी भाविक भक्त आपली मनपुर्वक कामना झाल्याने त्या दिपमाळीमध्ये मोठ्या शंध्देने तेल टाकुन आपली भावना पुर्ण करत आसल्याचे येथील पुजारी परसराम टोपाजी गायकवाड यांनी माहीती सागितली आहे.

माता इसाई देवीच्या जन्मा बद्दल सागायचे म्हटले तर माता इसाई देवी हे पुजार्याच्या घरामधील चुलीमध्ये बैलभंडार आडळुन आला आसता हाच माझा जन्म आसल्याचे पुज्यार्यांनी सांगितले, आशी माता इसाई देवीच्या जन्मा बद्दलची आख्याकीका आसल्याचे ही गावातील मंडळी बोलल्या जात आहे. तसेच माता इसाई देवीच्या यात्रे पासुन गावामध्ये विविध धार्मीक कार्यक्रम चालु आसल्याने गावात भक्तीमय वातावरण निर्माण राहात असते.दरवर्षी दर्शन घेण्यासाठी भाविक भक्त मोठ्या संख्येने येत असतात.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त वृक्ष लागवड

**अक्षराज : गणेश भवार**

**दि.२२, नवी मुंबई :** २२ एप्रिल हा दिवस जगभरात 'वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जात असून पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीचा विचारपूर्वक वापर करणे आणि वाढते प्रदूषण रोखून पर्यावरणाचे संतुलन राखणे याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी 'वसुंधरा दिन' अत्यंत महत्वाचा मानला जातो.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही जागतिक वसुंधरा दिवस निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त उदयान विभागाच्या वतीने आठही विभाग कार्यालय क्षेत्रात मोठया संख्येने वृक्षारोपण करण्यात आले. नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते से.२६, नेरुळ येथील झोटींगदेव मैदान याठिकाणी पिंपळवृक्ष रोपाची लागवड करण्यात आली.

याप्रसंगी उपस्थित अतिरिक्त आयुक्त शिरिष आरदवाड, शहर अभियंता संजय देसाई, उदयान विभागाचे उपआयुक्त दिलीप नेरकर, नेरुळ विभागाचे सहा. आयुक्त श्री. अमोल पालवे, कार्यकारी अभियंता राजेश पवार, उदयान अधिक्षक श्री. भालचंद्र गवळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

त्याचप्रमाणे वसुंधरा दिनानिमित्त नवी मुंबईत ९ विविध ठिकाणी एक हजारहून अधिक देशी वृक्षारोपांची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे लागवड करण्यात आलेली सर्व वृक्षरोपे ही देशी प्रजातीची होती. ज्यामध्ये पिंपळ, वड, बहावा, बकुळ, ताम्हण, सोनचाफा, जांभुळ, कदंब अशा देशी वृक्षरोपांचा समावेश होता.

आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्राधान्याने पक्ष्यांना हवेहवेसे वाटेल अशी फळे व फुले असलेली देशी वृक्षरोपे लागवड करण्यात यावीत व या माध्यमातून नवी मुंबई शहराच्या जैवविविधतेमध्ये लक्षणीय भर पडेल अशा वृक्षरोपांची लागवड करण्याच्या सूचना दिलेल्या असून त्यानुसार फळाफुलांनी बहरणारी वृक्षरोपे लावण्यात येत आहेत. वसुंधरा दिनानिमित्त नेरुळ सेक्टर – २६ येथील झोटींगदेव मैदानाप्रमाणेच वाशी सेक्टर – १० येथील मीनाताई ठाकरे उद्यान, पामबीच मार्ग सर्व्हिस रस्ता, से–१०, सानपाडा येथील संवेदना उदयान, आर्टिस्ट व्हिलेज बेलापूर तलावानजिक, निसर्गोदयान कोपरखैरणे, सेंट्रल पार्क घणसोली, ठाणे बेलापूर मार्गावर कोपरखैरणे भुयारी मार्गाजवळ, से–१४ ऐरोली गुरुव्दाराजवळ, दिघा रामनगर येथील बोराले तलावाजवळ अशा नऊ ठिकाणी जागेच्या उपलब्धतेनुसार एक हजाराहून अधिक वृक्षरोपांचे संबंधित विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी, उदयान अधिकारी, व स्वच्छता अधिकारी यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. ही वृक्षारोपण मोहीम सुरूच असणार आहे.

# भाजपच्या बिगबॉसची महाविकासच्या कार्यकर्त्यावर नजर - माजी मंत्री अमित देशमुख

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२१, मुदखेड (नांदेड) :** नांदेड लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ २१ एप्रिल रोजी तालुक्यातील बारड येथे एका जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेला संबोधन करताना माजी मंत्री तथा आमदार अमित भैया देशम ुख यांनी महायुतीवर जोरदार हल्ला बोल करत देशातील १६ राज्यात असलेल्या स्थिर सरकारा उधळून लावत आपल्या मर्जीतील सरकार स्थापन करण्याचे महापाप महायुतीनं केल्याचा घणाघात त्यांनी केला.

२६ एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवा व केंद्रात महाविकास आघाडीचं सरकार स्थापन करण्यास मदत करा असे अवाहन देखील त्यांनी यावेळी उपस्थीत मतदारांना केले.त्यांनी शोले फिल्मची एक आठवण करून दिली जेंव्हा गब्बर गावात येतो तेंव्हा गाववाले दारे लावून बसतात अशीच घटना महायुतीचे उम ेदवार यांच्या प्रचार करण्यासाठी गावात



गेले असता गावातील लोकांनी दारे बंद करून घेतल्याची घटना एका गावात घडली आहे.

बारड येथील साप्ताहिक बाजार ठिकाणी घेण्यात आलेल्या सभेत माजी मंत्री अमित देशमुख यांनी भाजपावर चौफेर टिकेचे वार केले.नांदेड ही लढवय्या क्रांतीकारी संताची भुमी असुन हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा इतिहास या भुमी मध्ये घडला.भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेसचे लोकसभा उमेदवार वसंतराव चव्हाण यांच्या प्रचारादरम्यान त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्राम या इतिहासाला गालबोट लावण्याचे काम देखील भाजपने केल्याचा आरोप त्यांनी केला.

या वेळी कॉँग्रेस उमेदवार वसंतराव चव्हाणांसह अमदार मोहन हंबर्डे , नांदेड उत्तर चे जिल्हाध्यक्ष हानमंत पाटील बेटमोगरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख बबन बारसे,मनोहर धोंडे, यशपाल भिंगे, तिरुपती कोंडेकर, कॉँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, माणिक लोमटे, शिवसेना तालुकाप्रमुख पिंटु पाटील वासरीकर,विश्वांभर पवार, मुदखेड शहराध्यक्ष कैलास गोडसे, विठ्ठलराव पावडे, सुभाष लोणे, संदिप देशमुख, राहुल आठवले, श्निवास महादवाड, अदींची प्रमुख उपस्थीती होती.खताच्या वाढत्या किंमती, गॅसदर वाढ, पेट्रोलदर वाढ, बेरोजगारी शेतकऱ्याच्या मालाला हमी भाव नसल्याने उद्योग धंदे बंद पडत असल्याने या ज्वलंत प्रश्नांना बगल देवुन दिशाभुल करण्याचे काम सुरु असल्याचे सांगत अशा भुलथापा देणाऱ्या सरकारकडे पाहण्याचा सर्वांचा दृष्टिकोन बदला असुन नांदेड जिल्ह्याचे मतदार निश्चितच याचा वचपा काढणार असे संकेत सूरुवाती पासूनच मिळत असल्याचे आमदार अमित देशम ुख यांनी सांगितले.अशोक चव्हाणांनी जरी भाजप सोबत हात मिळवणी केली असली तरी,देशमुखांच्या संपूर्ण भाषणात स्व.शंकरराव चव्हाणांची शेवट पर्यंत त्यांनी सहानुभूती राखली हे विषेश:

नांदेड येथे झालेल्या महायुतीच्या प्रचारात पंतप्रधान नारेंद्र मोदी यांनी मराठा आरक्षणावर भ्र देखील काढला नाही.महागाई व बेरोजगारी सारख्या ज्वलंत मुद्द्यांना त्यांनी हेतूपूरस्सर बगल दिल्याचेही त्यांनी सांगितले.चव्हाणांच्या पक्षांतराने तालूका कॉँग्रेस पक्षाला पोरका झाला असं वाटत असतांना चव्हाणांच्या अनेक खंदे समर्थक कॉँग्रेस पासून दुर गेले नाहीत त्यापैकी एक कॉँग्रेसचे नुतन तालूकाध्यक्ष प्रतापरावांनी जे प्रस्ताविक मांडले ते स्थानिक मतदारांचे आकर्षण ठरले.

तसेच सभेचे सुत्रसंचालन सुभाष लोणे यांनी केले तर आभार संदीप देशम ुख यांनी मानले

# सुजितराव तुम्ही आमच्याशी दोस्ती करून पहा : राधाकृष्ण विखे पाटील

**अक्षराज; राजकुमार इकडे**

**दि.२२, सुपा (अ.नगर) :** सुजितराव आता कंबर कसा उद्याचा दिवस तुमचा आहे. हातपाय आखडायचे नाही. उतरायचं तर पूर्ण ताकतीने तुमच्या मागे संपूर्ण ताकद उभी करायला मी तयार आहे. हे मी तुम्हाला जनतेच्या साक्षीने सांगतो. उद्या कोणीतरी वरचे साहेब येतील, पुण्याचे येतील सुजितरावांना बोलून घेतील तू काळजी करू नको मी तुझं बरोबर करतो मग तुमचा पूर्ण कार्यक्रम झाला समजायचं, तुम्हाला संभाळणारच नाही.

स्वर्गीय वसंतराव झावरे पाटलांचा त्यांनी स्वतःच्या राजकारणासाठी वापर केला. तुमचाही वापर केला, पण तुम्ही आता शहाणे झाला, बरंय गेले नाही तिकडं तुम्ही त्यांच्याशी दोस्ती करून पाहिली तुम्ही आमच्याशी दोस्ती करून पहा असे महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील टाकळी ढोकेश्वर येथे पारनेर तालुक्याचे नेते सुजित झावरे पाटील मित्र मंडळ व देवकृपा फाउंडेशनच्या वतीने भाजपचे नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या आयोजित प्रचार सभे मध्ये कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले ही निवडणूक देशाचे भवितव्य घडवणारी आहे. मोदींना आपल्याला तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे. पारनेर तालुक्यात अनेक समस्या आहेत. पिंपळगाव जोग्याचे हक्काचे पाणी मिळाली पाहिजे. कान्हूर पठार उपसा सिंचन योजनेचा प्रश्न मार्गी लागला आहे. पुढील काळात तालुक्याची दुष्काळी ओळख पुसण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. सुपा एमआयडीसी मध्ये भूमि पुत्रांना रोजगार मिळून देण्यासाठी सुद्धा प्रयत्नशील राहणार असल्याचे मंत्री विखे यांनी यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पारनेर तालुक्याचे नेते सुजितराव झावरे पाटील यांनी आम्ही सर्व ताकतीने खासदार सुजय विखे पाटील यांच्या पाठीमागे उभे असून पारनेर तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्य देणार असल्याचे सांगितले. तसेच पुणे जिल्ह्याचे नेते मंगलदास बांदल यांचेही यावेळी भाषण झाले त्यांनी चौफेर टीका केली.

नगर दक्षिण लोकसभा मतदार संघामध्ये खासदार डॉ. सुजय विखे व माजी आमदार निलेश लंके हे या निवडणुकीला एकमेकांसमोर सामोरे जाणार आहेत. निलेश लंके हे पारनेरचे भूमिपुत्र असल्याने विखे यांनी पारनेर तालुक्यात लंकेना रोखण्यासाठी मोठी ताकद लावली आहे. तालुक्यात ठीक ठिकाणी प्रचार सभा व बैठकांना सध्या मोठा जोर आला आहे. या सभांना होणारी उच्चांकी गर्दी ही राजकीय जाणकारांच्या भुवया उंचवायला लावणारी आहे.



पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर व ढवळपुरी जिल्हा परिषद गटाच्या वतीने टाकळी ढोकेश्वर येथील कटारिया मंगल कार्यालयामध्ये भाजपचे उमेदवार खा. सुजय विखे यांच्या प्रचारार्थ नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये प्रचार बैठक पारनेर तालुक्याचे नेते सुजित झावरे पाटील यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली होती या बैठकीला पाच ते सहा हजार लोकांची उपस्थिती होती.

मंत्री राधाकृष्ण विखे यांचे सुजित झावरे पाटील यांच्या वतीने टाकळी ढोकेश्वर मध्ये जोरदार स्वागत करण्यात आले त्यांची टाकळी ढोकेश्वर गावातून ढोल ताशाच्या गजरात फटाक्यांच्या आतिश बाजीत मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीमध्ये मोठ्या संख्येने युवक सहभागी झाले होते.

यावेळी कार्यक्रम प्रसंगी जेष्ठ नेते सिताराम खिलारी, पुणे जिल्ह्याचे नेते मंगलदास बांदल, ज्येष्ठ नेते विनायक देशमुख, अण्णासाहेब बाचकर, मा. सभापती बाबासाहेब तांबे, पारनेर तालुका भाजप अध्यक्ष राहुल शिंदे पाटील, मा. सभापती गणेश शेळके, युवा नेते सचिन वराळ पाटील, मा. सभापती अरुण ठाणगे, ज्येष्ठ नेते निजाम पटेल, पारनेर तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी अध्यक्ष विक्रम कळमकर, पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, शहाजी कवडे, ढवळपुरी उपसरपंच बबन पवार, मनसे पारनेर तालुका अध्यक्ष बाळासाहेब माळी, योगेश रोकडे, राळेगण थेरपाळ सरपंच पंकज कारखिले, डॉ. भाऊसाहेब खिलारी, डॉ. किशोर ढोकळे, पारनेर नगरसेवक युवराज पठारे, पंचायत समिती सदस्या सुप्रिया अमोल साळवे, सतीश पिंपरकर, भाजपा किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी रोकडे, आदी मान्यवर व सुजित झावरे पाटील मित्र मंडळ देवकृपा फाउंडेशनचे पदाधिकारी पारनेर तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी तसेच युवक महिला व आदी मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने टाकळी ढोकेश्वर येथे उपस्थित होते.

# माध्यम कक्षातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली मतदानाची प्रतिज्ञा

**अक्षराज : संगिता वनकळस**

**दि.२२, कळंब ( धाराशिव) :** (माध्यम कक्ष) लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत माध्यम कक्ष आणि माध्यम व प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीमधील अधिकारी व कर्मचारी यांना समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी आज ७ मे २०२४ रोजी ४०–धाराशिव मतदारसंघासाठी होणाऱ्या निवडणूकीत मतदान करण्याची प्रतिज्ञा दिली. यावेळी आम्ही भारताचे नागरीक लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की,आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करुन आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखून व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश,जात,समाज व भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु. अशी प्रतिज्ञा घेण्यात आली.

तत्पूर्वी जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी विवेक खडसे यांनी सर्व उपस्थित अधिकारी–कर्मचारी यांना मतदान करण्याचे आवाहन करुन लोकशाहीच्या उत्सवामध्ये सर्वांनी उत्स्फूर्तपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे आणि मतदान करावे.असे सांगितले. याप्रसंगी पत्रकार रवींद्र केसकर,शीतल वाघमारे,प्रा.डॉ.जी.टी. जमादार,प्रा.शरीफ शेख,प्रा.बी.एस. उडचण,सहायक पोलीस निरीक्षक गजानन जाधव,रेणूका राठोड,प्रा. उमेश नरवडे,अमोल सोलनकर,युसुफ मोमीन,नंदू पवार,चित्रा घोडके,संदीप उंडे,विनोद जानराव,सुनिल माळी, अनिल वाघमारे,श्रीकांत देशमुख, वैभव पाटील,राधा पैकीकर व नेहा वैरागे आदी उपस्थितांनी मतदानाची प्रतिज्ञा घेतली.

# शेकडोंच्या समुदायाने केला मतदानाचा संकल्प !

**दि.२२, नांदेड :** दि.२६ एप्रिल रोजी नांदेड येथे होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारांनी मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडावे, यासाठी जिल्हा प्रशासनाने आज विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेला साद घातली आहे. प्रत्येक कर्मचाऱ्यांने किमान ५० मतदारांना मतदानासाठी प्रेरित करण्याचा संकल्प आज शेकोडोंच्या संख्येने, उपस्थित कर्मचाऱ्यांनी नांदेड पोलीस परेड ग्राउंडवर केला.

सोमवारची सकाळ पोलीस परेड ग्राउंडवर नांदेड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांच्या हजारोच्या एकत्रिकरणाने उल्हासित झाली होती. शिक्षक, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, बचत गटांचे सदस्य, शाळकरी विद्यार्थ्यांच्या जोश पूर्ण सादरीकरणाने वातावरण भारावून गेले होते. निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर मोठ्या संख्येने दुसऱ्या टप्प्यात मतदान झाले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

त्यानुसार नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनात व महानगरामध्ये मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनात मोठ्या प्रमाणात जनजागृती सुरू आहे. आज या दोघांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद व मनपा कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती.

स्वीपच्या सर्वात मोठ्या उपस्थितीच्या या कार्यक्रमांमध्ये नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी आलेले खर्च निरीक्षक डॉ. दिनेशकुमार जांगिड, खर्च निरीक्षक मग्पेन भुटिया यांच्यासह जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, शिक्षणाधिकारी सविता बिरगे, माधव सलगर यांच्यासह जिल्हा परिषदेचे, मनपाचे अनेक अधिकारी उपस्थित होते.

# सिडको नवी मुंबई व महानगरपालिकेत नोकरी लावण्याच्या आमिषाने फसवणूक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नवी मुंबई :** सरकारी नोकरी मिळणे हे अनेकांसाठी स्वप्न असते. अनेक तरुण-तरुणी त्यासाठी प्रयत्न करत असतात. मात्र काही भामटे या संधीचा फायदा घेऊन सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांची आर्थिक फसवणूक करतात. असाच एक धक्कादायक प्रकार नवी मुंबई येथे घडला आहे.

सिडको नवी मुंबई व महानगरपालिका येथेनोकरी लावण्याचेआमिष दाखवत त्या बहाण्यानेतरुणी नामेस्मिती मुकादम व तरुण नामे शुभम पाटील यांची तब्बल ६ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या आर्थिक फसवणुकी प्रकरणी एन. आर. आय. सागरी पोलीस ठाणे नवी मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तरुणी नामे स्मिती मुकादम असे फिर्यादीचे नाव असून त्यांनी एन.आर. आय.सागरी पोलीस ठाणेनवी मुंबई येथे धाव घेत फसवणुकीची तक्रार नोंदवली.

गुरुवारी ही फिर्याद दाखल करण्यात आली त्या फिर्यादीच्या आधारे एन.आर.आय.सागरी पोलीस नवी मुंबई यांनी आरोपी नामेसिडको मधील सुरक्षा रक्षक निलेश मोतीराम देशमुख, सतीश राजाराम सावंत,




अजिंक्य भोसले व नीलकंठ जाधव यांचेविरोधात ४२०,४०६,३४ अन्वयेगुन्हा दाखल केला आहे. दिनांक २५ जुलै २०२३ रोजी पासून हा प्रकार बेलापूर येथे घडला आहे. फिर्यादी हेबेलापूर भागात राहतात त्यांची आरोपी नामे निलेश मोतीराम देशमुख व सतीश राजाराम सावंत यांच्याशी ओळख झाली. दि.२५ जुलै २०२३ रोजी निलेश देशमुख हे फिर्यादीचे घरी आले व त्यांनी त्यांचे शाळेचे पेपर व काही कागदपत्र पाहिले व ते फर्यादी यांचे कुटुंबास बोलले की, तुम्हाला सिडको नवी मुंबई किंवा महानगरपालिका या ठिकाणी नोकरी लावतो.

परंतु नोकरी लावण्याकरिता तुम्हाला रक्कम रुपये दोघांचे मिळून ६ लाख रुपये द्यावे लागतील, त्यांचेवर विश्वास ठेवून फिर्यादीने सहा लाख रुपये संबंधित आरोपीस दिले. आरोपींनी फिर्यादीस विश्वासात घेऊन त्यांना शंभरच्या बॉण्ड पेपर वर हमीपत्र लिहून दिले की, तुम्ही दिलेले पैसे नोकरी न मिळाल्यास पूर्ण रक्कम परतावा करू व तुम्ही दिलेली रक्कम ही आम्हाला सिडकोच्या अधिकारी अजिंक्य भोसले यांस देणे आहे असे फिर्यादीस सांगण्यात आले होते. पूर्ण पैसे दिल्यानंतर मुलांना नोकरी काही लावली नाही. त्यामुळे फिर्यादीने त्यांच्याकडून ६ लाख रुपये परत मागितले. मात्र आरोपी यांनी पैसेदेण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर निलेश देशमुख यांनी फिर्यादीचे चुलत भाऊ शुभम पाटील व त्यांची आई यांस कर्जत रायगड येथे घेऊन गेले व त्या ठिकाणी नीलकंठ जाधव यांचे बरोबर ओळख करून दिली. त्यावेळी नीलकंठ जाधव यांनी फिर्यादीचे कुटुंबास सांगितले की मी सुद्धा तुमची नोकरीचे काम केले आहे. लवकरच तुम्हाला नियुक्तीपत्र मिळेल. त्यामुळे फिर्यादीचे कुटुंबाने आज उद्या नोकरी मिळेल या उद्देशाने फिर्यादी यांनी थोडे दिवस जाऊन दिले.

परंतु नोकरीस लावण्यास विलंब झाला. त्यामुळे फिर्यादीने निलेश देशमुख यास संपर्क केला असता त्यांनी फोन उचलण्याचे टाळले होते. परंतु वारंवार फोनद्वारे कॉल केल्याने एके दिवशी फोन उचलून आरोपीने फिर्यादीस सांगितले की आम्ही सिडकोच्या अधिकारी अजिंक्य भोसले यांस तुम्ही दिलेली रक्कम दिली असून त्यांनी ती रक्कम परत दिले की, तुमचे पैसे परत देऊ, फोन करू नका नाहीतर तुमच्यावरच पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करू आरोपीने असे फिर्यादीस सांगितल्याने, फसवणूक झाल्याचे फिर्यादी यास निदर्शनास आले आहे.

त्यानंतर फिर्यादीस सिडको नवी मुंबई किंवा महानगरपालिका मध्ये सरकारी नोकरीचे आमिष दाखवून एजंट असल्याचा दावा करून फिर्यादीला विश्वासात घेऊन आर्थिक फसवणूक केल्यामुळे आरोपी नामे निलेश मोतीराम देशमुख (सुरक्षा रक्षक रक्षक मंडळ जिल्हा ठाणेकार्यरत सिडको नवी मुंबई सुरक्षा रक्षक व्यक्ती), सतीश राजाराम सावंत, अजिंक्य भोसलेव नीलकंठ जाधव यांचेवर भादवि.कलम ४२०,४०६,३४ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. याप्रकरणी एन.आर. आय. सागरी पोलीस ठाणेनवी मुंबई पुढील तपास करीत आहेत.

# महायुतीच्या प्रचाराला वेग ; मोदींच्या नावाची घोषणा करत प्रचाराला सुरुवात



**अक्षराज : दत्तात्रय शिंदे**

**दि.२२, खारघर (रायगड) :** खारघर प्रभाग ६ मध्ये भा.ज.पा चे माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, समिर कदम, भा.ज.पा च्या कांचन बिर्ला तसेच राष्ट्रवादी काँग्रेस चे बळिराम नेटके, महायुतीचे सर्व शाखा प्रमुख, विभाग अध्यक्ष, कार्यकर्ते आणि खारघर मधील नागरिकांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग बारणे यांना प्रचंड मतांनी विजयी करा. आणि फिरसे एक बार मोदी सरकार, अबकी बार चारसो पार अशी घोषणाबाजी करत जोरदार प्रचाराला सुरुवात केली.

# महायुतीविरोधात समता परिषदेचे निषेधास्त्र

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहमदनगर :** लोकसभा निवडणुकीत नाशकातून अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना उमेदवारी देण्याबाबत पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आदेश दिलेले असतानाही त्यांची पायमल्ली करण्यात आली. सरकारमधील शुक्राचार्यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने उद्विग्न होत मंत्री छगन भुजबळ यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. यामुळे ओबीसींना डावलले जात असल्याची भावना राज्यातील ओबीसी बांधवांत निर्माण झाली आहे. यामुळे ओबीसी समाज अस्वस्थ असुन असंतोष धुमसत आहे. या असंतोषाचा मतदानावर विपरीत परिणाम होऊ शकतो,असा इशारा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते नागेश गवळी आणि जिल्हा अध्यक्ष सुभाष लोंढे यांनी काल शनिवारी पत्रकार परिषदेत दिला. लोकसभा निवडणुकीतून माघार घेण्यासाठी छगन भुजबळ यांना भाग पाडण्यात आले असल्याची भावना महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मनात आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील महायुती सरकारच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी काल नगर शहरातील माळीवाडा येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी समता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते नागेश गवळी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य अंबादास गारुडकर, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, नाभिक संघटना जिल्हाध्यक्ष अनिल निकम,समता परिषदेचे पारनेर तालुका अध्यक्ष बबनराव घुमटकर, उपाध्यक्ष वसंत रांधवण, डॉ. स्मिता तरटे,गोरख आळेकर, प्रसाद खामकर,दत्तात्रय व्यवहारे, गणेश व्यवहारे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आचारसंहिता नियमावलीचे उल्लंघन होणार नाही याकडे काटेकोर लक्ष द्या - आयुक्त

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, नवी मुंबई :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सर्वत्र आदर्श आचारसंहिता लागू झालेली असून आचारसंहिता पालन केली जात असल्याबद्दल विभागीय पातळीवर काटेकोरपणे दक्ष रहावे व कोणत्याही प्रकारे आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याबाबतच्या आढावा बैठकीत दिले.

आदर्श आचारसंहितेच्या नियमानुसार प्रचार फलक यांना परवानगी देण्यात यावी. परवानगी देताना सर्वांना समान न्याय देण्यात यावा. अशाच प्रकारे प्रचारासाठी मैदाने उपलब्ध करून देण्याबाबतही समान भूमिका ठेवण्यात यावी. कोणत्याही प्रकारे विनापरवानगी होर्डींग, बॅनर्स, झेंडे लागणार नाहीत याची दक्षता घ्यावी. याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच खाजगी संस्थांच्या जाहिरातीही हटविण्यात याव्यात. उद्घाटने, शुभारंभ यांच्या कोनशिला झाकून घेण्यात याव्यात. अशा सर्व बाबींकडे आठही विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी क्षेत्रीय स्तरावर स्वत: पाहणी करून गांभीर्याने लक्ष द्यावे असे आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले. त्याचप्रमाणे एनएमएमटी बसेस व बसस्थानके याठिकाणीही विनापरवानगी फलक लागणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासोबतच लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढण्याच्या दृष्टीने विविध प्रसार माध्यमांचा अधिक चांगला उपयोग करून व्यापक जनजागृती करावी असेही निर्देश आयुक्तांनी दिले. यामध्ये, विभाग कार्यालय पातळीवर मतदान जनजागृती कक्ष स्थापन करावा व या कक्षाद्वारे नागरिकांना मतदानाविषयी, त्यांचा मतदार क्रमांक व मतदान केंद्र आदी बाबींविषयी माहिती द्यावी, मतदान करण्यासाठी संपर्क साधून प्रोत्साहित करावे असे निर्देश आयुक्तांनी दिले. त्याचप्रमाणे आपापल्या विभागीय क्षेत्रातील सोसायट्या, वसाहती,



उद्योगसमुह याठिकाणी भेटी देऊन मतदान करणेविषयी जनजागृती करण्याचेही आयुक्तांनी निर्देशित केले. लोकसभा निवडणूकीत प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा यादृष्टीने क्षेत्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन रेल्वे स्टेशन, बसडेपो, मार्केट, मॉल, मार्ट्स, सिनेमागृहे, नाट्यगृहे, मंगल कार्यालये, रूग्णालये, सभागृहे, उद्याने अशा वर्दळीच्या ठिकाणी विविध माध्यमांतून मतदानाविषयी व्यापक स्वरूपात जनजागृती करण्याचे आयुक्तांनी निर्देशित केले. याशिवाय फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉट्स अॅप अशा समाज माध्यमांचाही प्रभावी वापर करावा तसेच एनएमएमटी बसेसवर फलक लावून व बसेसमध्ये ऑडिओ सूचना प्रसारित करून जनजागृती करण्याचे सूचित करण्यात आले.

प्रचार, प्रसिध्दीप्रमाणेच मतदान केंद्रांची सर्व आवश्यक सुविधांसह सिध्दता करून ठेवण्याचेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले. ही केंद्रे मा.निवडणूक आयोगाने सूचित केल्याप्रमाणे तळमजल्यावर असावीत असे सूचित करीत या केंद्रावर पाणी, विद्युत, स्वच्छतागृहे, रॅम्प अशा व्यवस्थेसह प्रामुख्याने व्हिलचेअरचीही व्यवस्था करणेबाबत आयुक्तांनी निर्देश दिले. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सुव्यवस्थित रितीने पार पडणे ही आपली सर्वांची जबाबदारी असून त्याकडे काटेकोर लक्ष देण्यासोबतच या निवडणूकीमध्ये प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याकडेही विशेष लक्ष देण्याचे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी संबंधित विभागांचे विभागप्रमुख व सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांना आढावा बैठकीत दिले.

# सातारा लोकसभा उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची नोंदवही तपासण्याचे वेळापत्रक जाहीर

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२२, सातारा :** सातारा लोकसभा मतदार संघातील उमेदवारांनी जिल्हाधिकारी कार्यालय,सातारा येथे जिल्हा खर्च नियंत्रण समितीकडे निवडणुक खर्चाची नोंदवही विहित वेळेत तपासून घ्यावेत,असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहे. सातारा लोकसभा मतदार संघातील उमेदवाराने प्रचार मोहिमेच्या कालावधीमध्ये किमान तीन वेळा तपासणीसाठी जिल्हा खर्च नियंत्रण समिती, सातारा सादर करण्यासाठी एक तर व्यक्तीश: किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत किंवा त्याने यथोचीतरित्या केलेल्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत खर्चाची नोंदवही सादर करणे आवश्यक आहे.

उमेदवारांच्या लेख्यांची तपासणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे वेळापत्रक निश्चीत करण्यात आले आहे. खर्च नोंदवहीची प्रथम तपासणी २६ एप्रिल रोजी सकाळी १० ते ५ यावेळेत होईल, द्वितीय तपासणी ३० एप्रिल रोजी १० ते ५ तर तृतीय तपासणी ही ४ मे रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत जिल्हा नियंत्रण खर्च समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे खर्चाची नोंदवह्या तपासण्यात येतील.

# मिरा भाईंदर महानगरपालिकाची पावसाळी पूर्व आढावा बैठक संपन्न

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२२, मिरा भाईंदर :** दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय शीपतराव काटकर (भाप्रसे) यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन तथा मान्सून पूर्व आढावा बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस अतिरिक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता, सहा. आयुक्त प्रभाग समिती क्रमांक १ ते ६, महापालिका अधिकारी, कर्मचारी, वाहतूक पोलीस अधिकारी, नॅशनल हायवे प्रतिनिधी, महानगर गॅस प्रतिनिधी, जे कुमारचे प्रतिनिधी उपस्थित होते. मान्सून दरम्यान कोणत्याही आपत्कालीन घटना यावर्षी घडू नये यासाठी आधीपासूनच आवश्यक ती दक्षता घेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर द्यावा असे निर्देश देत महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय शीपतराव काटकर (भाप्रसे) यांनी महानगरपालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत सुरू असलेली कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी निर्देश दिले. मान्सून २०२४ पावसाळापूर्व तयारीच्या अनुषंगाने विविध प्राधिकरणांसोबत आयोजित शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीप्रसंगी समितीचे अध्यक्ष म्हणून मा. आयुक्तांनी मिरा भाईंदर शहरातील सर्व प्राधिकरणांनी परस्पर समन्वय राखून नियोजन करावे व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी असे सूचित केले.

यामध्ये सध्या सुरू असलेल्या स्थापत्य विषयक कामांची स्थिती जाणून घेत ही कामे २४x७ तास सुरू ठेवून जलद गतीने व कामाची गुणवत्ता राखून कामे पूर्ण करावीत असे निर्देशित केले. रस्ते खड्डेमुक्त राहावेत याकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देतानाच कुठल्याही परिस्थितीत रस्त्यावर खड्डा चालणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले. मॅनहोल कव्हर व गटारांची साफसफाई करून त्यांच्यावरील तुटलेली झाकणे ही तातडीने बदलून घेण्याचे निर्देश दिले. गटार किंवा नाल्या शेजारील रस्त्यावरील डेब्रिज उचलणे व पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात बांधलेले गटारे साफ ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले. तसेच शहरातील बांधकामे सुरू असलेल्या इमारतींची माहिती व इमारतीच्या चहूबाजूंनी सुरक्षेच्या दृष्टीने जाळ्या व इतर अपघात प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. रस्त्यावरील दिवाबत्ती सुव्यवस्थित राहील व विद्युत खांबामुळे कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची खबरदारी घ्यावी. याकरिता प्रत्येक विद्युत खांबाची काळजीपूर्वक पाहणी करावी असे निर्देश देण्यात आले. वाहतुक पोलीस विभागामार्फत प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने पावसाळी काळात सिग्नल यंत्रणा नियमित कार्यान्वित राहील याकडे लक्ष द्यावे तसेच स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसींगच्या रंगरंगोटीचीही कामे आपापल्या अखत्यारितील रस्त्यांवर करून घ्यावीत असे सूचित करण्यात आले. सर्व पथदिवे सुरु राहतील याची खबरदारी घेण्याप्रमाणेच महावितरण कंपनीने उघड्या केबल, डिपीची झाकणे बंद असण्याची खबरदारी घ्यावी व दुरुस्ती करून घ्यावी अशा सूचना देण्यात आल्या. तसेच एम.टी. एन.एल, एम.जी.एल ने केलेल्या खोदाई संदर्भातील माहिती घेऊन तातडीने उर्वरित कामे पूर्ण करून घेऊन रस्ते दुरुस्ती करून घ्यावी असे निर्देश दिले. बंदिस्त नाले व नैसर्गिक नाले यांची सफाई विहित वेळेत पूर्ण करावी असे घनकचरा व्यवस्थापन विभागास निर्देश देण्यात आले. तसेच सफाईनंतर काठाशी काढून ठेवला जाणारा गाळ थोडासा

सुकल्यानंतर लगेच उचलला जावा याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे व तो कोणत्याही प्रकारे दूषीत होणार नाही याची काळजी घ्यावी असे सूचित करण्यात आले. तसेच आवश्यक एवढ्या ब्लिचिंग पावडरचा साठा करून ठेवणे व जल शुद्धीकरणकरीता आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

# वसुंधरा दिनानिमित्त सागरी किनाऱ्यावर विशेष स्वच्छता मोहीम




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, नवी मुंबई :** २२ एप्रिल या 'वसुंधरा दिवस' (अर्थ दिवस) निमित्त नवी मुंबई महानगर पालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ठिकाणी पर्यावरण संवर्धक विविध उपक्रम राबविण्यात आले.

या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ.राहुल गेठे, परिमंडळ १ चे उपायुक्त सोमनाथ पोटेर व बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल यांच्या नियंत्रणाखाली बेलापूर विभाग कार्यक्षेत्रात टी. एस. चाणक्य सागरी किनाऱ्या पाठीमागील भागात नवी मुंबई महानगर पालिका व टीएस चाणक्य युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी यांनी संयुक्तपणे स्वच्छता मोहीम हाती घेऊन किनाऱ्याची स्वच्छता केली.

या मोहिमेत स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, साफसफाई कर्मचारी व टीएस चाणक्याचे विद्यार्थी सहभागी होते. यावेळी उपस्थितांना जागतिक पृथ्वी दिनाच्या निमित्त माझी वसुंधरा अभियान अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी, आकाश या पंचमहाभूतांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची माहिती सांगण्यात आली तसेच पर्यावरण संवर्धनाची माझी वसुंधरा शपथ सामूहिकरीत्या घेण्यात आली.